**<u>सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण</u>**
**<u>सभेतील सहयोगी सभासदाच्या सहभागाबाबत</u>**

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक सगृयो- २००६/प्र.क्र.१/१४-स,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ३२.
दिनांक - १२ जून, २००७.

<u>प्रास्ताविक :-</u>

शासन आदेश, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, समक्रमांक, दिनांक ५ डिसेंबर, २००६ चे आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत :-

२. "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम २ (१९) अन्वये "सभासद" या व्याख्येत सहयोगी सभासदांचा अंतर्भाव आहे.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७५ अन्वये <u>सर्व सभासदांना</u> सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण सभेला हजर राहण्याची सूचना (notice) देणे आवश्यक आ[…] सभासदांच्या व्याख्येत "सहयोगी सभासद" अंतर्भूत असल्यामूळे सहयोगी सभासदांना सर्वसाधारण सभेला उपस्थित रहाण्याची व सभेमध्ये भाग घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. म[…] अशा सहयोगी सभासदांनी मत देण्याच्या अधिकारावर उक्त अधिनियमाच्या कलम २७ (२) अन्वये बंधन घालण्यात आलेले आहे. सहयोगी सभासदांस मत देण्याचा अधिकार मूळ सभासदाच्या अनुपस्थितीत सदर अधिनियमाच्या कलम २७ (२) अन्वये त्यामध्ये जो क्रम दर्शविलेला आ[…] त्यास अनुसरुन प्राप्त आहे.

४. या संदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

१) सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सहयोगी सभासदांना कायदेशीर तरतूदीप्रमाणे संस्थेच्या सर्वसाधारण सभेत ( ज्यात संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचाही अंतर्भाव होईल ) उपस्थित राहण्याचा व त्यामध्ये भाग घेण्याचा हक्क आहे.

२) मूळ सभासदांच्या अनुपस्थितीत, सहयोगी सभासद सर्वसाधारण सभेस […]ातत भाग घेऊन

ावाय अधिनियमाच्या कलम २७ (२) अन्वये जो क्रम दिला आहे त्यास अनुसरुन त्यास मतदानही करता येईल.

३) सर्वसाधारण सभेतील कोणत्याही बाबीसंदर्भात मूळ सभासद व सहयोगी भासद यांच्यामध्ये मतभिन्नता असल्यास मूळ सभासदांचे म्हणणे अधिकृत ठरविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.द.सालवे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

त अग्रेषित --

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (सहकार व पणन ) यांचे स्वीय सहाय्यक.
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन)
७) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
८) निवड संग्रह (१४-स)